**प्रेसनोट** **दि.०५/०४/२०१७**

## पोलीस दलातील कार्यालयीन कामकाज सुरक्षित व गतिमान करण्याकरिता "वर्कअ‍ॅप चॅट" अ‍ॅप नविन उपक्रम

सध्याच्या युगात मोबाईल संवाद साधण्यासाठी महत्वाचे माध्यम आहे.मोबाईलमधील इंटरनेट डाटाचा वापर करुन विविध अ‍ॅप्लिकेशनद्वारे एकमेकांशी संवाद साधु शकतो परंतु यात सुरक्षिततेचा अभाव असुन अधिक सुरक्षिततेसाठी पुणे पोलीसाव्दारे **वर्कअ‍ॅप चॅट अ‍ॅप हा** नविन उपक्रम **चॅटींग अ‍ॅप वर्क अ‍ॅप सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, एंटरप्रायजेस टेक्नोलॉजि कंपनी** यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

सध्या प्रचंड लोकप्रिय असलेले वॉटसअप अ‍ॅप मोठया प्रमाणात वापरतात परंतु त्याचा सर्व्हर भारताबाहेर असल्याने आपल्या सरकारचे किंवा संस्थेचे त्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे सदर माध्यामाव्दारे होणारे संदेशवहनाची माहिती गहाळ किंवा दुरुपयोग होऊ शकतो.

वर्कअ‍ॅप चॅट अ‍ॅप माध्यातातुन खालील प्रमाणे पुणे पोलीसांचे दैनंदिन कामकाज सुरक्षित व परिणामकारकरित्या होण्यास मदत होणार आहे.

१. कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व मोबाईल नंबरची माहिती नमुद असेल.
२. पुणे पोलीस आयुक्तालयातील सर्व कार्यालयांना कमी वेळात व तात्काळ माहिती मिळु शकेल.
३. सदर माहिती वाचली गेली आहे किंवा नाही याची सध्यस्थिती कळु शकेल.
४. पुणे पोलीस आयुक्तालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे वैयक्तिकरित्या किंवा ग्रुपमध्ये सुरक्षितपणे चॅट करु शकतील.
५. सदर अ‍ॅपमध्ये पुणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन व कार्यालये यांचे फोन नंबर व पत्ता मिळु शकेल.

सदर अ‍ॅपचे सर्व्हर मुंबई येथे आहे. सध्या सदर अ‍ॅप पथदर्शी प्रकल्प म्हणुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना वापरण्याकरिता देण्यात येणार आहे.


Pune Police
WorkApps Chat
let's work together...
A Secure and Dedicated Chat Application

